# PHOTO

| | |
|---|---|
|  |  |
| Cleanness drive at Datysudana Temple 2014-15 | Study Tour 2014-15 |
|  |  |
| **Payrtan Club 2014-15** | **Payrtan Club 2015-16** |
|  |  |
| **Payrtan Club 2016-17** | **Payrtan Club 2017-18** |

| | |
|---|---|
|  |  |
| **Payrtan Club 2018-19** | World Tourism Day and Cleanness Drive 2016-17 |
|  |  |
| World Tourism Day and Cleanness Drive 2017-18 | World Tourism Day and Cleanness Drive week 2018-19 |
|  |  |
| Wild Life 2016-17 | Payrtan Parv |



World Heritage Day 2018-19



Cleanness Drive in Lonar Mohostav 2016-17



Study Tour 20115-16



Archaeological Survey Of India Exhibition



Principal Dr.S.G. Bade Inaugurated Archaeological Survey Of India Exhibition




Khandiy Yuva Sansad



Cleanness Drive of Temples



Study Tour



Study Tour



Shree. Prshant Savai (Director MTDC Amravati)



Study Tour




Gandhi Vichar Sanskar Pariksha 2017-18



Wild Life Week 2017-18



Forest Department Exhibition 2018-19

| | |
|---|---|
|  | |
| Paryatan Parv 2017-18 | |

पुण्यनगरी २८ सप्टेंबर २०१६

# विदेशी पाहुणे रमले लोणार सरोवर परिसर स्वच्छतेत!



## पर्यटनासाठी आलेल्या दाम्पत्याने दिला स्वच्छतेचा संदेश

**लोणार/ प्रमोद वराडे :** देश, विदेशातून अनेक पर्यटक जगद्विख्यात लोणार सरोवर पाहण्यासाठी येतात... सरोवराची सैर करताना आनंदाने भरावून जात असतानाच काही चटक-मटक खायला आणलेले खाऊन नंतर कचरा सरोवरात वा काठावर फेकून देतात... कुणी त्याची साफसफाई स्वतःहून करताना दिसत नाही... पण निसर्ग सौंदर्याने नटलेले व जगातील एक वेगळे आश्चर्य असलेल्या सरोवर परिसरातील प्लास्टिक कचरा पाहून जर्मनतील एक जोडपे अचंबित झाले... या विदेशी पाहुण्यांनी सरोवराची न्याहाळणी सोडून थेट कचरा उचलायला सुरुवात केली... हे चित्र पाहून अन्य पर्यटक व शहरवासीय अवाक् झाले... मंगळवार, २७ सप्टेंबरला सरोवर स्वच्छतेत रमलेल्या या दाम्पत्याने जिल्हावासीयांसह सरोवर पाहण्यासाठी येणाऱ्यांना स्वच्छतेचा संदेश दिला...

फिलिफस व ज्युलीया असे या दाम्पत्याचे नाव आहे. जर्मनी येथून हे जोडपे जागतिक कीर्तीचे लोणार सरोवर पाहण्यासाठी आले होते. सरोवराच्या काठावर सुमारे अर्धा किलोमीटर परिसरात या दाम्पत्याने स्वच्छता मोहीम राबविली. सरोवराचे जतन करणे काळाची गरज असल्याने प्रथम स्वच्छतेकडे सर्वांनी लक्ष घालावे, अशी अपेक्षा या पाहुण्यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व भगवान बाबा महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आंतरराष्ट्रीय पर्यटन दिनाचे औचित्य साधून २७ सप्टेंबरला स्वच्छ भारत अभियान कार्यक्रम विश्राम गृह परिसरात आयोजिला होता. सरोवराचे पर्यटन करण्यासाठी फिलिफस व ज्युलीया हे दाम्पत्य आल्याचे समजल्यानंतर त्यांनाही स्वच्छता अभियानात सहभागी करून घेण्यात आले. या दाम्पत्याने तोंडाला मास्क लावून व हाताला हॅण्डग्लोज बांधून कचरा उचलण्यास सुरुवात केली. सरोवराच्या काठावर अर्धा किलोमीटर परिसरात त्यांनी साफसफाई केली. चिप्स, कुरकुरे व्हेपर्स, पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, प्लास्टिकचे ग्लास, पुड्या व अन्य कचरा विद्यार्थ्यांसह नागरिक व या दाम्पत्याने गोळा करून त्याची विल्हेवाट लावली. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात स्वच्छतेचा संदेश देत फिलिफस म्हणाले, असे सरोवर मी कोठेही पाहिलेले नाही. यावेळी नगराध्यक्षपती राजेश मापारी, पर्यटन महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक प्रशांत सवाई, तहसीलदार सुरेश कव्हळे, मुख्याधिकारी विजय लोहकरे, प्राचार्य डॉ. एस.जी. बढे, प्रा. नालिंदे, प्रा. करांगळे, प्रा. गजानन खरात

---

■ बुलढाणा/ epaper

# भगवानबाबा महाविद्यालयात जागतिक पर्यटन सप्ताहानिमित्त स्वच्छता मोहिम



स्वच्छता मोहिमेत सहभागी रासेयो स्वयंसेवक व प्राध्यापकवृंद

***तालुका प्रतिनिधी**/२५ सप्टेंबर*

**लोणार :** स्थानिक भगवानबाबा महाविद्यालयामधील राष्ट्रीय सेवा योजना पथकाने पर्यटन विभाग मुंबई यांच्या सहकार्याने लोणार सरोवर स्वच्छता मोहिम यशस्विपणे राबविली. नवरात्र उत्सवाच्या धरतीवर कमळजा देवीच्या दर्शनाचा मुख्य रस्ता व परिसर स्वयंसेवकांनी स्वच्छ केला.

या कार्यक्रमाप्रसंगी स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. मागील तीन वर्षांपासून भगवानबाबा कला व वाणिज्य महाविद्यालय रासेयो पथक लोणारमध्ये गाजर गवत निर्मूलन सप्ताह राबविणे या सप्ताहासाठी प्रा.डॉ. एल.के. करांगळे व प्रा.सौ. संगीता धंदर यांचे सहकार्य लाभले. यावर्षी स्वच्छता पंधरवाड्यात सरोवर परिसराची स्वच्छता करण्यात आली.

दर रविवारी सकाळी ६ ते ९ या दरम्यान सरोवर परिसर स्वच्छता व गांजर गवत निर्मूलनासाठी स्वयंसेवक उत्साहाने सहभाग घेत आहे. ही मोहिम वर्षभर चालणार आहे. मोहिमेसाठी महाराष्ट्र पर्यटन विभाग अमरावतीचे संचालक प्रशांत सवई, प्राचार्य डॉ.एस.जी. बडे यांनी सहकार्य केले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. गजानन खरात, प्रा. अश्विनकुमार राठोड (कार्यक्रमाधिकारी) प्रा. सुर्यकांत गिते सहकार्यक्रमाधिकारी प्रा.सौ. संगीता धंदर महिला कार्यक्रमाधिकारी व सर्व प्राध्यापकांनी सहकार्य केले.

---

देशोन्नती दि. ०४ ऑक्टो २०१६.

# लोणार सरोवर स्वच्छ करण्यासाठी देणार वर्षातील १०० तास

*तालुका प्रतिनिधी/३ ऑक्टोबर*

**लोणार :** जागतिक पर्यटन दिनानिमित्त महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वतीने जगविख्यात असलेले लोणार येथील खाऱ्या पाण्याचे सरोवर स्वच्छ करण्याची मोहीम हाती घेण्यात आली. अत्यंत उत्साहात पार पडलेल्या कार्यक्रमात जर्मनीतील पर्यटकांनीही मोठ्या हिरीरीने भाग घेतला.

लोणार परिसरातील खाऱ्या पाण्याचे सरोवर ही निसर्गाने भारताला बहाल केलेली मोठी देणगी आहे अशा शब्दात जर्मनीचे पर्यटक फिलीप्स आणि ज्युलीया या पतीपत्नी जोडप्याने आपल्या भावना व्यक्त केल्या.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वतीने राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियानात लोणार परिसरातील गावकऱ्यांनी सहभाग घेतला. यानिमीत्त लोणार परिसर स्वच्छ ठेवण्याची शपथ देण्यात आली.

पर्यटन विकास महामंडळ अमरावती विभागाचे प्रादेशिक व्यवस्थापक प्रशांत सवई यांच्या मार्गदर्शनात हे अभियान यशस्वीपणे राबविण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रमात भगवानबाबा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी पुढील वर्षातील १०० तास स्वच्छतेसाठी देण्याची शपथ घेतली.

याप्रसंगी बोलताना प्रशांत सवाई यांनी महाराष्ट्रामध्ये उपलब्ध असलेल्या पर्यटन उद्योगाच्या संधी या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले. पर्यटनाचा विकास करायचा असेल तर स्वच्छतेकडे दुर्लक्ष करता येणार नाही अन्यथा रोजगाराची संधी आपण गमावून बसू असा धोक्याचा इशारा त्यांनी दिला. जागतिक दर्जाच्या लोणार परिसराचे संवर्धन करणे नागरिकांची जबाबदारी असुन शासनाने या परिसराचा विकास करण्याचे ठरविले आहे. पर्यटन विकासामुळे लोणार परिसरातील युवकांना रोजगाराची संधी निर्माण झाली असून त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन सवाई यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद राजेश मापारी यांनी भूषवले. याप्रसंगी तहसीलदार सुरेश कव्हळे, न.प.चे मुख्याधिकारी विजय लोहकरे, भगवानबाबा महाविद्यालयाचे प्राचार्य बढे, प्रा.प्रशांत देशमुख, प्रा.खरात, प्रा.करांगळे आदी उपस्थित होते. एमटीडीसीचे गाईड अमोल सरदार, शैलेश सरदार, शेख जमिर व दिलीप राठोड यांनी परिश्रम घेतले.



- लोणार वासीयांनी घेतली स्वच्छतेची शपथ
- जर्मन पर्यटकही सहभागी
- महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा उपक्रम

मातृभूमी १२ ऑक्टो २०१४



## लोणार येथे पर्यटन क्लबची स्थापना

लोणार दि.११(ता.प्र.):- महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ अमरावती विभाग व भगवानबाबा महाविद्यालय लोणार जि.बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यटन क्लबची स्थापना करण्यात आली. या क्लबचे अध्यक्ष म्हणुन भगवानबाबा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.जी. बडे यांची नियुक्ती करण्यात आली तसेच यामध्ये इतिहास, भुगोल पर्यावरण या विषयासाठी प्रा.गजानन खरात, प्रा. विपुल भानुसे, प्रा.संगिता धंदर यांची सदस्य म्हणुन नियुक्ती करण्यात आली. पि.एस. नार्लिंदे यांची राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी यांची सचिव म्हणुन नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेचे २५ विद्यार्थी यामध्ये सदस्य म्हणुन निवडण्यात आले. श्रीमती शिफ्रा वोरा प्रादेशिक व्यवस्थापक म.प.वि.म. अमरावती यांची मार्गदर्शक व समन्वय सदस्य म्हणुन नियुक्ती करण्यात आली.

लोणार येथील पर्यटन संकुलामध्ये पर्यटन क्लबची स्थापना करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य एस.जी.बडे उद्घाटक म्हणुन सुधाकर बुगदाणे तर प्रमुख उपस्थितीमध्ये प्रमोद खोब्रागडे (पोलीस उपनिरीक्षक) प्रमुख मार्गदर्शक म्हणुन प्रा. गजानन खरात, सौ. संगिता धंदर यांनी मार्गदर्शन केले. पर्यटन क्लबबाबत व पर्यटनाच्या विविध योजनेबाबत पर्यटन विभाग अमरावतीचे उपप्रादेशिक व्यवस्थापक दिनेश बोराळे व मितेश रामटेके यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणामध्ये बडे यांनी पर्यटन स्थळाच्या स्वच्छतेची मोहीम राष्ट्रीय सेवा योजनेच्या व पर्यटन क्लबच्या माध्यमातुन सातत्याने राबविणार असे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा. राठोड यांनी तर आभार दिनेश बोराळे यांनी मानले.


**-: जाहीर नोटीस :-**

अर्जदारातर्फे वकिल श्री. एस. बी.खाडे

अर्जदार :- (१) विजय हरिभाऊ चोपडे वय ४२ वर्ष, धंदा - मजुरी (२) ... विजय चोपडे वय १९ वर्ष, धंदा - शिक्षण (३) ... विजय चोपडे, वय १६ वर्ष, धंदा - शिक्षण ... ता. खामगांव जि. बुलडाणा

---विरुध्द---गैरअर्जदार :- कोणीही नाही

अर्ज :- मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम


## लोणार येथे 'न्याहारी निवास योजना' लागू

### पर्यटन क्लबची स्थापना

लोणार : खाऱ्या पाण्याच्या जागतिक ख्यातीच्या सरोवरासह प्राचिन संस्कृतीचा वारसा लाभलेल्या आणि राज्यातील महत्वपूर्ण पर्यटनस्थळांमध्ये गणना होणाऱ्या लोणार येथील पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी पर्यटन महामंडळाने 'न्याहरी निवास योजना' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेबाबत जनजागृती होऊन, योजनेच्या यशस्वितेसाठी स्थानिकांचा प्रतिसाद मिळावा, या हेतूने पर्यटन क्लबची स्थापनाही करण्यात आली आहे.



लोकमत इम्पॅक्ट

पर्यटन दिनाचे औचित्य साधून ३० सप्टेंबर रोजी 'लोकमत'ने 'न्याहरी योजनेकडे शासनाचे दुर्लक्ष, पर्यटन महामंडळाच्या योजनेपासून लोणार वंचित' या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्ताची दखल घेत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे अमरावती प्रादेशिक महाव्यवस्थापकांनी लोणार पर्यटनस्थळी 'न्याहरी निवास योजना' कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला. लोणार पर्यटन विकासाला चालना मिळण्यासाठी भगवानबाबा महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत पर्यटन क्लबची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे पर्यटन विकासात स्थानिकांचा सहभाग वाढणार असून, यातून स्थानिकांना रोजगाराची संधीही प्राप्त होणार आहे. पर्यटकांना घर मालकासोबत राहून स्थानिक संस्कृती, राहणीमान, चालीरिती आणि खाद्यपदार्थांची या योजनेतून चांगल्या प्रकारे ओळख होईल. पर्यटक आणि स्थानिकांमध्ये मैत्री संबंध दृढ होण्यास मदत होतील. न्याहरी निवास योजनेच्या यशस्वितेसाठी पर्यटकांसाठी करमणुकीच्या सुविधा पर्यटन महामंडळास उपलब्ध करुन द्याव्या लागणार आहेत. सुविधा उपलब्ध झाल्यास पर्यटक येथे मुक्कामी राहू शकतील. पर्यटन महामंडळाला न्याहरी निवासी योजनेच्या माध्यमातून स्थानिकांचा सहभाग घेण्याची संधी प्राप्त झाली आहे.

न्याहरी निवास योजना योग्य प्रकारे राबविल्यास येथील उद्योजकांची व्याप्ती वाढेल, स्थानिक उत्पादनास बाजारपेठ मिळू शकेल. शासकीय मान्यतेमुळे पर्यटकांमध्ये विश्वासार्हता वाढेल आणि यातूनच पर्यटकांच्या संख्येत वाढ होऊन पर्यटन विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.






on OnePlus
VINKUMAR RATHOD